क्रमांक : १३७६८ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ५ ऑगस्ट, २०२६.

:: **कार्यालयीन आदेश** ::

श्री.रोहन शरद घाडीगांवकर यांची या सचिवालयातील 'गट-ड' संवर्गातील **"मदतनीस"** (वेतनस्तर एस-१ : १५०००-४७६००) (अधिक नियमानुसार मिळणाऱ्या भत्त्यांसह) या पदावर **अनुकंपा तत्त्वावर** बुधवार, दिनांक ५ ऑगस्ट, २०२६ रोजीपासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून नियुक्ती करण्यात येत आहे :-

१) श्री.घाडीगांवकर यांची "मदतनीस" पदावरील अनुकंपा तत्वावरील नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार करण्यात येत आहे.

२) श्री.घाडीगांवकर यांची नियुक्ती तात्पुरती असून, सदर नियुक्ती त्यांचे पुर्वचारित्र्य, वर्तणूक व वैद्यकीय तपासणी अहवाल इ. वर अवलंबून राहील.

३) श्री.घाडीगांवकर हे आरक्षित प्रवर्गातील असल्यास त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे.

४) श्री.घाडीगांवकर यांनी रुजू होतेवेळी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी (Domicile Certificate) असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

५) श्री.घाडीगांवकर यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ च्या नियम ४ नुसार विहीत नमुना 'अ' मधील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

६) श्री.घाडीगांवकर यांना या नियुक्तीपासून किमान ७ वर्ष सेवा कालावधी पूर्ण होईपर्यंत प्रतिनियुक्तीसाठी इच्छुकता देता येणार नाही.

७) वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक अंनियो/१००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ तसेच वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक अंनियो/२०१५/(NPS) प्र.क्र.३२/सेवा-४ दिनांक ६ एप्रिल, २०१५ मधील तरतूदींनुसार त्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) लागू राहील.

८) शासकीय कर्मचाऱ्यांकरीता विहीत केलेल्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

९) श्री.घाडीगांवकर यांनी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत स्वग्राम घोषित करणे आवश्यक आहे. तद्नंतर त्यांनी स्वग्राम घोषित केल्यास संपूर्ण सेवेच्या कालावधीत घोषित केलेल्या स्वग्रामामध्ये बदल करता येणार नाही.

१०) उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त सर्वसाधारणपणे शासनाने विहित केलेल्या इतरही सेवाविषयक नियम लागू असतील व त्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

११) श्री.घाडीगांवकर यांनी आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ प्रतींची तपासणी करुन घेण्यासाठी हे आदेश प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत मुळ प्रमाणपत्र 'क-१' (आस्थापना) कक्षात सादर करावी.

सदरहू पदावर रुजू होण्यासाठी उक्त उमेदवाराला कोणताही प्रवास भत्ता देण्यात येणार नाही. तसेच त्यांना असेही कळविण्यात येते की, सेवेचे त्यागपत्र द्यावयाचे झाल्यास त्यांना कार्यालयास एक महिन्याची पूर्व सूचना द्यावी लागेल अथवा त्याऐवजी एक महिन्याचे वेतन कार्यालयास परत करावे लागेल.

श्री.घाडीगांवकर यांनी या आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांत कार्यालयीन वेळेत हजर होऊन त्याप्रमाणे निम्न स्वाक्षरीत अधिकारी यांना कळवावे.

आदेशानुसार,

**( नागसेन बनसोडे)**
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

श्री.रोहन शरद घाडीगांवकर
ए-०३, सुमित्रादेवी को.ऑप.हौ.सोसा.,
सत्यवान चौक, उमेश नगर,
डोंबिवली (प.), मुंबई ४२१ २०२
भ्रमणध्वनी क्र. :- ७२०८१९०८२८

**प्रतिलिपी :-**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव

२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव

३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे कार्यालय

४) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

५) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

६) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

७) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

८) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

९) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

१०) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

११) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१२) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१३) वैयक्तिक नस्ती

१४) निवडनस्ती